पुढारी





कोल्हापूर : सुरुवातीला पांढरा दिसणारा चंद्राचा पृष्ठभाग ग्रहण सुरू झाल्यानंतर तांबूस दिसू लागला. (छाया : तय्यब अली)

# खगोलप्रेमींनी लुटला छायाकल्प चंद्रग्रहण पाहण्याचा आनंद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

वर्षातील दुसरे छायाकल्प चंद्रग्रहण पाहण्याचा आनंद खगोलप्रेमी नागरिकांनी रात्री लुटला.

कोल्हापुरात शुक्रवारी रात्री ११ वाजून १५ मिनिटांनी ग्रहणाची सुरुवात झाली. पृथ्वीची उपछाया फिकट गुलाबी असल्यामुळे जोपर्यंत चंद्र कमीत कमी अर्ध्यावर सरकत नाही, तोपर्यंत चंद्रग्रहणाचा परिणाम लक्षात आला नाही. छायाकल्प ग्रहणाचा मध्यरात्री १२ वाजून ५४ मिनिटांनी मध्य होता. चंद्राचा ५७ टक्के भाग यावेळेस पृथ्वीच्या उपछायेतून छायाकल्प गेल्याने तो तांबूस रंगाचा दिसत होता. ६ जूनच्या रात्री २ वाजून ३४ मिनिटांनी चंद्राची ग्रहणाची अवस्था संपली. छायाकल्प चंद्रग्रहणाचा कालावधी हा ३ तास १८ मिनिटे होता.

यावेळी पौर्णिमेच्या चंद्राची ग्रह कालावधीत तेजस्विता उणे ०.९७ ते उणे ०.४१ असल्यामुळे ते पाहताना डोळ्यांची विशेष काळजी घ्यावी लागली नाही. त्यामुळे साध्या डोळ्यांनी व दुर्बिणीच्या साह्याने चंद्रग्रहण पाहता आले. हे चंद्रग्रहण भारतासह आशिया, ऑस्ट्रेलिया, आफ्रिका, दक्षिण, पूर्व दक्षिण अमेरिका, पॅसिफिक, अटलांटिक, हिंद महासागर, अंटार्क्टिका भागातून दिसले. यापुढील चंद्रग्रहणे ५ जुलै, ३० नोव्हेंबर व १४ डिसेंबर रोजी होतील. मात्र यातील दोन ग्रहणे भारतातून दिसणार नाहीत, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी दिली.

पुढारी

# लावलेली झाडे जगविण्याशिवाय पर्याय नाही : डॉ. शिंदे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सद्यस्थितीत पर्यावरणासह सर्वच घटकांमध्ये बदल झाला आहे. पर्यावरण संवर्धनासाठी झाडे लावून ती जगविण्याशिवाय पर्याय नाही, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात जागतिक पर्यावरणदिनानिमित्त आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, गेल्या दोन महिन्यांपासून लॉकडाऊन सुरू असल्याने वसुंधरेने मूळरूप दाखविण्यास सुरुवात केली आहे. यावेळी व्ही. टी. पाटील, प्रशांत गायकवाड, संजय शिंदे, डॉ. पी. डी. राऊत आदी उपस्थित होते.

Edition
6 Jun, 2020 Page No. 3
Powered by : erelego.com

# १४ सेंटरवर ८२४ नागरिकांचे अलगीकरण

**कोल्हापूर ( पुढारी वृत्तसेवा) :** महापालिकेने शहरात विविध ठिकाणी सुरू केलेल्या १४ अलगीकरण कक्षांत ८२४ नागरिकांना ठेवण्यात आले आहे. शेंडापार्क येथील आरोग्य प्रशिक्षण केंद्रातील अलगीकरण कक्षामध्ये १८, खासगी ठिकाणी (१८ ठिकाणी) २५३, पंजाबराव देशमुख वसतिगृह ४९, राजाराम कॉलेज ४१, अल्पसंख्याक मुलींचे वसतिगृह ५३, कृषी विद्यापीठ वसतिगृह ६९, शिवाजी विद्यापीठ ४२, शिवाजी विद्यापीठ मुलांचे वसतिगृह ३७, न्यू कॉलेज वसतिगृह ८४, सैनिकी मुलींचे वसतिगृह ४९, विवेकानंद कॉलेज ६०, कमला कॉलेज १६, जैन बोर्डिंग ३५, लिंगायत वसतिगृहात १८ नागरिकांना अलगीकरण कक्षामध्ये ठेवण्यात आलेले आहे. ५०१ नागरिकांना होम क्वारंटाईन केले आहे.

# छायाकल्प चंद्रग्रहण पाहण्याचा खगोलप्रेमींनी लुटला आनंद

प्रतिनिधी
कोल्हापूर

वर्षातील दुसरे छायाकल्प चंद्रग्रहण खगोल प्रेमी, नागरिकांनी पाहण्याचा आनंद वटपौर्णिमेच्या रात्री लुटला. शुक्रवारी रात्री ११ वाजून १५ मिनिटांनी चंद्रग्रहणाला सुरुवात झाली. या छायाकल्प ग्रहणाचा मध्य रात्री १२ वाजून ५४ मिनिटांनी होता आणि चंद्राचा ५७ टक्के भाग पृथ्वीच्या उपछायेतून छायाकल्प गेल्याने तो



तांबूस रंगाचा दिसत होता. पहाटे २ वाजून ३४ मिनिटांनी ग्रहण संपले. प्रत्येकाने घराच्या छतावरून चंद्रग्रहण पाहण्याचा आनंद घेतल्या. छायाकल्प चंद्र ग्रहणाचा कालावधी हा ३ तास १८ मिनिटे इतका होता. पौर्णिमेच्या चंद्राची ग्रहकालावधीत तेजस्विता उणे ०.९७ ते उणे ०.४१ होती. त्यामुळे साधेपणासह दुर्बिणीच्या सहायाने चंद्रग्रहण पाहण्याचा आनंद नागरिकांनी लुटला. हे चंद्रग्रहण संपूर्ण भारतासह, आशिया, ऑस्ट्रेलिया, आफ्रिका, दक्षिण/पूर्व दक्षिण अमेरिका, पॅसिफिक, अटलांटिक, हिंद महासागर,अंटार्क्टिका या भागात दिसले. यापुढील चंद्रग्रहणे ५ जुलै, ३० नोव्हेंबर आणि १४ डिसेंबर रोजी होतील असे शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधनकेंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी सांगितले.

तरुण भारत Sat, 06 June 2020
https://epaper.tarunbharat.com/c/52549931

लोकमत

# छायाकल्प चंद्रग्रहणाचा खगोलप्रेमींनी लुटला आनंद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** निरभ्र आकाश, पौर्णिमेचा प्रखर चंद्र अशा आकाशातील विलोभनीय दृश्याला शुक्रवारी रात्री ग्रहण लागले आणि हा योग खगोलप्रेमींनी मोठ्या उत्कंठतेने पाहण्याचा आनंद लुटला. चंद्राला लागलेल्या छायाकल्प ग्रहणाचा कालावधी हा ३ तास १८ मिनिटे इतका होता.

कोल्हापुरातून शुक्रवारी (दि. ५) रात्री ११ वाजून १५ मिनिटांनी या वर्षातील दुसऱ्या छायाकल्प चंद्रग्रहणची सुरुवात झाली. पृथ्वीची उपछाया फिकट गुलाबी असल्यामुळे जोपर्यंत चंद्र कमीत कमी अर्ध्यावर सरकत नाही तोपर्यंत चंद्रग्रहणाचा परिणाम लक्षात आला नाही. हे ग्रहण या छायाकल्प ग्रहणाच्या मध्यरात्री १२ वाजून ५४ मिनिटांनी होते आणि चंद्राचा ५७ टक्के भाग यावेळेला पृथ्वीच्या उपछायेतून छायाकल्प गेल्याने तो तांबूस रंगाचा दिसत होता. पहाटे २ वाजून ३४ मिनिटांनी चंद्राची ग्रहण अवस्था संपली. पौर्णिमेच्या चंद्राची ग्रह कालावधीत तेजस्विता उणे ०.९७ ते उणे ०.४१ असल्यामुळे ते पाहताना डोळ्यांची विशेष काळजी घ्यावी लागत नसल्यामुळे साध्या डोळ्यांनी आणि दुर्बिणीच्या साहाय्याने चंद्रग्रहण पाहण्याचा आनंद लुटता आला. सर्वांनी अंधश्रद्धेला मागे टाकत हे चंद्रग्रहण पाहिले. यापुढील चंद्रग्रहणे दि. ५ जुलै, ३० नोव्हेंबर आणि १४ डिसेंबर रोजी होतील; परंतु ते भारतातून दिसणार नाहीत, असे शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी सांगितले.

लोकमत

# प्र-कुलगुरुच 'प्रभारी'?

कोल्हापूर : कोरोनाच्या पार्श्वभूमीवरील सद्य:स्थिती पाहता शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा प्रभारी कार्यभार प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सोपविण्यात येण्याची शक्यता विद्यापीठ वर्तुळातून व्यक्त होत आहे.

या विद्यापीठाचे बारावे कुलगुरु असणाऱ्या डॉ. देवानंद शिंदे यांच्या पाच वर्षांचा कालावधी दि. १८ जून रोजी संपणार आहे. नवीन कुलगुरु निवडीची प्रक्रिया त्रिसदस्यीय समितीकडून सुरु झाली आहे. निवड होईपर्यंत कुलगुरुपदाचा कार्यभार प्रभारींकडे सोपवावा लागणार आहे. अंतिम सत्राच्या परीक्षांचा मुद्दा, 'नॅक'च्या मूल्यांकनाची प्रक्रिया पाहता त्यासाठी विद्यापीठाच्या कामकाजाची माहिती असणाऱ्या व्यक्तीची आवश्यकता आहे. त्या पार्श्वभूमीवर विचार करता विद्यमान प्र-कुलगुरु डॉ. शिर्के यांच्याकडे प्रभारी कार्यभार सोपविण्याची शक्यता आहे.

## शिवाजी विद्यापीठाचे आतापर्यंतचे प्रभारी

आर. एन. पाटील, व्ही. के. घाटे, व्ही. एम. चव्हाण (प्र-कुलगुरु), ए. ए. डांगे (बीसीयूडी संचालक), अशोक भोईटे (प्र-कुलगुरु) यांनी प्रभारी कुलगुरु म्हणून काम पाहिले आहे.

Kolhapur Main
Page No. 7 Jun 06, 2020
Powered by: erelego.com